बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
*एक परिवार एक बैंक*

## एकात्मिक जोखीम व्यवस्थापन विभाग
## मुख्य कार्यालय, पुणे - 411005.

आमचे बहुमूल्य ग्राहक

24.02.2021

बँक ऑफ महाराष्ट्र बरोबर आपल्या आर्थिक व्यवहारांबद्दल आम्ही आपले आभारी आहोत.

आपल्या बँक खात्याची सुरक्षा ही आमच्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची आहे. ग्राहकांचे प्रशिक्षण आणि जागरुकता या संदर्भात बँक ऑफ महाराष्ट्र नेहमीच प्रागतिक आहे. सुरक्षेच्या संदर्भात ग्राहकांना जागरुक ठेवणे हे आमचे ध्येय आहे, त्यासाठी आम्ही ग्राहक जागरुकता– 23 या ठिकाणी प्रकाशित करीत आहोत. पुढे यापैकी काही बाबी आहेत त्या आपणास उपयुक्त आणि माहितीपूर्ण वाटतील असा विश्वास वाटतो.

## ग्राहक जागरुकता– 23
### अलिकडे झालेली ऑनलाईन फसवणूक आणि ती कळविणे

अलिकडच्या काळात सायबर घोटाळे घडल्याच्या अनेक घटना आहेत. हे घोटाळे करणारे लोक जनतेला फसवण्यासाठी अनेक प्रकारच्या युक्त्यांचा वापर करीत आहेत, त्यात कोवीड–19 लसीकरण, नोकरी देण्याचे प्रस्ताव, लॉटरी इत्यादी. त्यामुळे, आम्ही आपणास पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचवीत आहोत.

- कोणत्याही कारणासाठी बँक फोन/ई–मेल/एसएमएसद्वारे बँक खात्याची माहिती ग्राहकांना विचारीत नाही.
- अशा प्रकारचा फोन/ई–मेल/एसएमएस यास प्रतिसाद देऊ नये आणि कोणत्याही कारणासाठी बँक खात्याचा तपशिल कोणासही देऊ नये.
- कधीही आपला सीव्हीव्ही/डेबिट/क्रेडिट कार्डचा पिन नं. कोणासही सांगू नये.
- बँकेचा खात्रीशीर कस्टमर केअर क्रंमाक, जो बँकेच्या वेबसाईटवर आहे फक्त त्याचाच वापर करा.
- सायबर फसवणूक किंवा कार्ड हरविणे / गैरवापर होणे याबाबत तक्रार पुढीलप्रमाणे करावी.

1. आमचा टोल फ्री कस्टमर केअर क्रंमाक –1800 233 4526, 1800 1022 2636
2. आपल्या नोंदणीकृत ई–मेल आयडीवरुन आपला या संदर्भातला तपशिल mahaconnectmahabank.co.in वर पाठवावा.
3. आपली तक्रार आमची वेबसाईट > www.bankofmaharashtra.in वर tact uscomplaints/Grievances क्लिक हियर टू फिल ऑनलाईन कंप्लेट फॉर्म येथे पाठविणे.
4. आपली तक्रार नोंदविण्यासाठी बँकेच्या जवळच्या शाखेला भेट देणे.

- आपण मोबाईल बँकिंग/इंटरनेट बँकिंग सुविधा वापरुन आपले कार्ड हॉटलिस्ट करू शकता.
- पुढील अर्थिक नुकसान टाळण्यासाठी वर नमूद केल्यानुसार कोणतीही पद्धत वापरावी असा सल्ला बँक देत आहे.
- सायबर फसवणुकीच्या प्रयत्नांबाबत जागरूक रहा आणि अशी कोणतीही फसवणूक/प्रयत्न या संदर्भात कायम जागरुक रहा.

मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र, यांच्यामार्फत